IO 47 (31)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** केज
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0714 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/12/2025 19:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 29/12/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/12/2025
   **Time From (वेळेपासून):** 13:52 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/12/2025 **Time (वेळ):** 19:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/12/2025 19:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** वा चे केज ,शहरातील तहसिल कार्यालय,केज समोरील केज ते बीड , जाणारे मेनरोडवरील एका,चहाच्या टपरीवर केज
   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शरदचंद्र सुरेशराव रोडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जालना, ,जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जालना, ,जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9765137652

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | माणिक आण्णासाहेब वाघमारे | | | 1. शाहु नगर, धाराशीव,धाराशीव , धाराशिव ग्रामीण,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि,29/12/2025

मी,शरदचंद्र सुरेशराव रोडगे, वय-37वर्ष, पद-पोलीस निरीक्षक- ने.अॅन्टी करन्प्शन ब्यूरो जालना, मो.क्र. 9765137652 ईमेल आयडी sharadrodge@gmail.com.

पोलीस ठाणे केज, ता. केज, जि.बीड येथे समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, आज दिनांक 29.12.2025 रोजी तक्रारदार नामे महेश फकिरा गव्हाणे, वय-40 वर्ष, रा. बोरगाव बु// ता.केज, जि.बिड, व्यवसाय- सहशिक्षक व शेती, यांनी केज येथे आम्हा व शासकीय पंचासमक्ष लेखी तक्रार दिली की,"माझी बोरगाव बु// ता. केज, जि.बीड, या गावाच्या शिवारात गट क्र. 85 मध्ये 3 एकर 36 गुंठे जमीन आहे. मी माझ्या जमीनीची मोजणी होवून हददखुणा कायम करण्यासाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज, ता.केज, जि.बीड येथे अर्ज दिला होता. त्यावरून दिनांक 18.12.2025 रोजी माणिक आण्णासाहेब वाघमारे हे आमच्या शेतात आले होते. त्यांनी त्यादिवशी गट क्र. 85 मधील माझी व इतर 1.शशीकांत लक्ष्मण गव्हाणे, 2. रामराव लहू वळेकर, 3.बाळासाहेब वामन गव्हाणे, 4. संतोष गव्हाणे असे गटातील सर्व जमीनधारकांची जमीनीची मोजणी केली होती. मोजणी झाल्यानंतर आम्ही सर्वजण चहाच्या हॉटेलवर गेलो त्यावेळी मोजणी करणारे वाघमारे यांनी आम्हाला सांगीतले की, गट क्र. 85 च्या सातबाऱ्यावर वाढीव क्षेत्र आहे आणि निजाम कालीन टिपण कमी आहे. तुम्हाला जर तुमच्या जमीनीचे क्षेत्र कमी करायची नसेल तर मला सगळे मिळून 30,000/- रुपये द्या, तुमच्या जमीनीचे क्षेत्र कमी न करता फाईल निकाली काढतो असे म्हणून त्यांनी आम्हाला पैशांची मागणी केली. त्यावेळी मला माझ्या जमीनीचे क्षेत्र मोजणी मध्ये कमी होण्याची भिती वाटल्याने मी स्वत: माझ्याजवळील 5000 रुपये माणिक वाघमारे यांना दिले होते. त्यावेळी गटातील सर्व जमीनधारक हजर होते. त्यानंतर वेळोवेळी मी माझा मोबाईल क्रमांक-8767177515 यावरुन माणिक वाघमारे यांच्या 8080731422 या मोबाईल क्रमांकावर कॉल करुन जमीन मोजणीच्या टिपणाची मागणी केली असता त्यांनी मला उर्वरीत लोकांकडून पैसे गोळा करुन 25000 रुपये घेवून ये असे म्हणू लागले. परंतु, मला उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज येथील जमीन मोजणीचे काम करणारे माणिक आण्णासाहेब वाघमारे यांना बाकी राहिलेले पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी कोणतीही वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांच्याशी माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. माणिक वाघमारे हे मला मागणी करीत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहिती आहे. म्हणून मी दिनांक 27.12.2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्यूरो जालना येथील श्री. जाधवर साहेबांना संपर्क केला होता. त्यावरुन पो.नि. श्री.शरदचंद्र रोडगे साहेब हे आज दिनांक-29.12.2025 रोजी केज शहरामध्ये आल्याने तसेच मला मराठी लिहता वाचता येत असल्याने मी माझ्या स्वहस्तक्षरात तक्रार अर्ज लिहुन दिलेला आहे.मी आज दिनांक 29.12.2025 रोजी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज येथे जावून माणिक आण्णासाहेब वाघमारे यांना माझ्या कामाविषयी बोलणार आहे त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी.वरील प्रमाणे तक्रारदार श्री.महेश गव्हाणे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक-29.12.2025 रोजी केज शहराजवळच एका सुरक्षित ठिकाणी थांबुन तक्रारदार श्री.महेश गव्हाणे, दोन्ही पंच क्र. 01 श्री. सुनिल जगताप व श्री.दौलत ढवळे तसेच सापळा पथकास तक्रार पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देवून लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यावरून पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन एका कापडी पिशवीमध्ये ठेवून कापडी पिशवी कोणालाही दिसणार नाही अशा रीतीने तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांच्या गळयात अडकवली.

त्यानंतर तक्रारदार श्री.महेश गव्हाणे यांना पंच क्र. 01 श्री. सुनिल जगताप यांचे सोबत मोटार सायकलने उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज, ता.केज, जि.बीड येथे पाठवून माणिक आण्णासाहेब वाघमारे यांची समक्ष भेट घेवून लाच मागणी पडताळणी केली असता उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज, ता.केज, जि.बिड या

कार्यालयामध्ये पंच क्र. 01 श्री.जगताप यांचे समक्ष नगर भूमापन लिपिक माणिक आण्णासाहेब वाघमारे यांनी तक्रारदार महेश गव्हाणे यांचेकडून यापुर्वी 5000 (पाच हजार) रुपये स्विकारल्याचे मान्य करुन तक्रारदार नामे श्री. महेश गव्हाणे यांचे मौजे बोरगाव बु// ता. केज या गावाच्या शिवारातील गट क्र. 85 मधील मोजणी केलेल्या जमीनीचे क्षेत्र कमी न करता मोजणी फाईल निकाली काढण्यासाठी गट क्र. 85 मधील इतर जमीन धारकाडून प्रत्येकी पैसे गोळा करून 25,000 रुपये लाचेची मागणी करुन स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केलेला आहे. वरील प्रमाणे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी वरुन नगर भूमापन लिपिक माणिक आण्णासाहेब वाघमारे यांचे विरुध्द उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज या ठिकाणी सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथकाच्या मदतीने दोन्ही शासकीय पंच क्र.01 श्री.सुनिल जगताप व क्र.02 श्री. दौलत ढवळे यांना तसेच तक्रारदार श्री.महेश गव्हाणे यांना सापळा कारवाईत वापरण्यात येणाऱ्या अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहिती देवून प्रात्यक्षिक दाखविण्यात आले त्यावेळी तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांनी 500 रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा असे लाच म्हणून वापरण्यासाठी 10,000/- (दहा हजार रु.) एवढीच रक्कम उपलब्ध असल्याचे सांगीतल्याने त्यांचेकडून सदरील रक्कम घेवून त्यास पोलीस अंमलदार श्री. कापसे यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावली. त्यानंतर अॅन्थासिन पावडर लावलेली लाचेची 10,000/- (दहा हजार रु.) रक्कम तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांच्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आली. त्यानंतर सापळा पथकास तसेच दोन्ही पंचाना सापळा कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या तसेच तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांना लाचेची 10,000/- (दहा हजार रु.) रक्कम ही माणिक वाघमारे यांनी स्विकारल्यानंतर डाव्या हाताने उजव्या हाताच्या बाही वर करुन लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांच्या अंगातील शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर पंच क्र. 01 श्री. जगताप व तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांना त्यांचेजवळील मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणाहून उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज येथे जावून नगर भूमापन लिपिक माणिक वाघमारे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ शासकीय वाहनाने आम्ही स्वत:, पंच क्र.02श्री. ढवळे व सापळा पथक असे उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज येथे पोहोचलो व त्याठिकाणी एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात आम्ही सापळा लावून थांबलो.

काही वेळाने तक्रारदार श्री.महेश गव्हाणे व पंच क्र. 01 श्री.जगताप असे नगर भूमापन लिपिक माणिक वाघमारे यांचेसह भूमि अभिलेख कार्यालयाचे बाहेर आले व पायी पायी चालत चालत केज ते बिडकडे जाणारे मेन रोडवर येवून एका चहाच्या टपरीवर जावून बसले. त्यानंतर काही वेळाने 13.52 वाजेच्या सुमारास तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांनी भूमापन लिपिक माणिक वाघमारे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा केला असता. सापळा पथक, आम्ही स्वत: तसेच पंच क्र. 02 दौलत ढवळे असे तात्काळ सक्रिय होवून नगर भूमापन लिपिक माणिक आण्णासाहेब वाघमारे यांना लाचेच्या रक्कमेसह पकडले. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

तरी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज, ता.केज, जि.बीड येथील नगर भूमापन लिपिक माणिक आण्णासाहेब वाघमारे, वय 50 वर्ष, रा.शाहु नगर, धाराशीव, ता.जि.धाराशीव यांनी तक्रारदार नामे श्री.महेश गव्हाणे यांचे मौजे बोरगाव बु// ता. केज या गावाच्या शिवारातील गट क्र. 85 मधील मोजणी केलेल्या जमीनीचे क्षेत्र कमी न करता मोजणी फाईल निकाली काढण्यासाठी आज दिनांक 29.12.2025 रोजी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय केज येथे पंच क्र. 01 श्री. सुनिल जगताप यांचे समक्ष तक्रारदार श्री.महेश गव्हाणे यांचेकडून यापूर्वी 5,000 (पाच हजार) रुपये रक्कम स्विकारल्याचे मान्य करुन गट क्र. 85 मधील इतर जमीन धारकाडून प्रत्येकी पैसे गोळा करून 25,000 रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.

तसेच सापळा कारवाई दरम्यान आज दिनांक 29.12.2025 रोजी 13.52 वाजेच्या सुमारास केज शहरातील तहसिल कार्यालय केज समोरील केज ते बीड जाणारे मेनरोडवरील एका चहाच्या टपरीवर नगर भूमापन लिपिक माणिक आण्णासाहेब वाघमारे यांनी पंच क्र. 01 श्री. सुनिल जगताप यांचे समक्ष तक्रारदार श्री. महेश गव्हाणे यांचेकडून उजव्या हाताने अॅन्थासिन पावडर लावलेली लाचेची 500 रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा अशी 10,000/- (दहा हजार ) रुपये लाचेची रक्कम स्विकारून अंगातील पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवून स्विकारली. म्हणून नगर भूमापन लिपिक माणिक आण्णासाहेब वाघमारे, वय 50 वर्ष, रा.शाहु नगर, धाराशीव, ता.जि.धाराशीव यांचे विरुध्द माझी कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.